**प्रस्तावना** :- **चाविद्रा-रामनगर डंपींग ग्राऊड येथे कचरा ढिग लेव्हल करणेसाठी पोकलन मशीन भाडे तत्वावर घेणेसाठी प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांना सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

शहरात निर्माण होणा-या कच-याची विल्हेवाट सद्या चाविद्रा-रामनगर येथील मनपाच्या जागेत लावण्यात येते या ठिकाणी दररोज ४०० ते ४५० टन कचरा टाकला जात असल्याने कच-याचे मोठ्या प्रमाणात ढीग निर्माण होवुन कचरा वाहने आत पर्यंत जाण्यास अडथळे निर्माण होतात.तसेच कचरा ढिंगामुळे दुर्गधी निर्माण होवुन चाविद्रा सभोवतालच्या परिसरात असणा-या नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण पोहचण्याची शक्यता असते.या करिता पोकलन मशीनची आवश्यकता भासते.

शहरातुन दररोज निघणारा कच-याची विल्हेवाट योग्यरित्या व मुदतीत करणे आवश्यक असल्याने दैनंदिनरित्या लावणेकामी डंपिग ग्राउंड येथे भाडेतत्वावरील पोकलन मशीन सदर कामाची मुदत दि.०७/०७/२०२२ रोजी संपुष्टात येणार असल्याने त्या अगोदर पोकलन मशीन कार्यरत होणे आवश्यक असुन पुढील कालावधीत येणारे सण पाहता डंपींग ग्राऊंड येथे कचरा वाढण्याचे प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तथापि प्रति दिन रु.१३,२५३/- (इंधन,चालक व क्लिनरसह) इतका खर्चानुसार दि.०८/०७/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ या कालावधीत २६५ दिवसा करिता प्रति दिन रु.१३,२५३/- या दरानुसार रु.३५,१२,०४५/- इतका खर्च येत असुन होणा-या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता प्राप्त झाली असुन पोकलन मशीन भाडेतत्वावर घेणेसाठी बाजार भावातील दर प्राप्त होणे करिता ऑनलाईन निविदा मागविण्यात आले असता याकामी ५ निविदाकार यांनी सहभाग घेतला असुन प्राप्त निविदाकार यांनी सादर केलेल्या दस्ताऐवजांची छाननी मा.निविदा समिती समक्ष सादर करण्यात येवुन लिफाफा क्र.२ खुले करण्यात आले असता खालील प्रमाणे एकुण खर्च प्राप्त झाला आहे.

| कामाचा तपशील | मे.चंडिका कन्स्ट्रक्शन, भिवंडी | मे.ओमसाई इटरप्रायजेस, भिवंडी | एस.एस. इलेक्ट्रीक भिवंडी | मे.हिमालय एम.पाटील, भिवंडी | मे.बुबेरे ॲण्ड असोसिएट, भिवंडी |
|---|---|---|---|---|---|
| पोकलन मशीन घेणे बाबत प्रति दिन आठ तासाकरिता रु.१३,२५३/- २६५ दिवसा साठी रु.३५,१२,०४५/- | रु.५५,००,०००/ | रु.३१,९९,९००/ | रु.३०,३५,०००/ | रु.३३,४८,०००/ | रु.३४,४१,८००/ |

वरील प्रमाणे दरांचे अवलोकन केले असता याकामी सर्वात प्रति तासासाठी कमी दर हे मे.एस.एस.इलेक्ट्रीक, भिवंडी यांनी २६५ दिवसा करिता रु.३०,३५,०००/- असे सादर केले आहेत.

तथापि आरोग्य व स्वच्छता विभागा मार्फत पोकलन मशीन भाडेत्तवावर घेणेसाठी प्रस्तावित करण्यात आले असता प्रति दिनकरिता एकुण रु.१३,२५३/- दिवसा करिता २६५ दिवसा करिता रु.३५,१२,०४५/- या खर्चास प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे.

ई-निविदे द्वारे प्राप्त झालेले मे.एस.एस.इलेक्ट्रीक,भिवंडी यांनी २६५ दिवसा करिता पोकलन मशीन भाडेतत्वावर घेणेसाठी प्रति दिन रु.११,४५३/- (आठ तासा करिता) प्रमाणे एकुण खर्च रु.३०,३५,०००/- सादर केला असुन रु.४,७७,०४५/- इतकी खर्च कमी सादर केला आहे.

सद्यास्थिती कचरा ढिग लेव्हल करणेचे कामात पोकलन मशीन अभावी अडथळा निर्माण झाला असुन कचरा खाली करणेसाठी येणारी वाहने सुद्धा डंपींग ग्राऊंड येथे अडकुन राहतात सदर पोकलन मशीन द्वारे वाहनाचा मार्ग मोकळा करणे मदत होईल.

सबब पोकलन मशीन २६५ दिवसाकरिता भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी ई-निविदे द्वारे प्राप्त झालेले मे.एस.एस.इलेक्ट्रीक,भिवंडी यांनी एकुण खर्च रु.३०,३५,०००/- असा सादर केला असुन सादर आहेत.सद्यास्थिती सादर केलेल्या निविदाकारास व खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

प्रशासकिय ठराव क्र. २५ दि. १९/०७/२०२२

चाविद्रा-रामनगर डंपींग ग्राऊडवर कचरा ढिग लेव्हल करणेसाठी पोकलन मशीन भाडेतत्वावर घेणेसाठी ऑनलाईन निविदे द्वारे प्राप्त झालेले निविदाकार व निविदाकार यांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत विनंती आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ(१अ)व १(ब) च्या तरतुदी

नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापना कामी चाविंद्रा-रामनगर येथील डंपीग ग्राऊंडवर दैनंदिन स्वरुपात येणा-या कच-याचे नियोजन (ढिगा-याचे लेव्हल करणे) करणेसाठी प्रशासनाने प्रस्तावित केल्यानुसार मे.एस.एस.इलेक्ट्रीक,भिवंडी यांनी ऑनलाईन निविदे मध्ये सर्वात कमी खर्च म्हणजे रु.३०,३५,०००/- इतकी रक्कम सादर केली असुन सादर केलेल्या खर्चास व निविदाकारास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका